जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2017
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठातर्फे 'संविधानदूत' योजना

## सांविधानिक मूल्यांच्या प्रचाराचे कार्य

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठाच्या** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे येत्या संविधान दिनानिमित्त (२६ नोव्हेंबर) 'संविधानदूत' ही अभिनव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी आज येथे दिली.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत सांगताना डॉ. महाजन म्हणाले, सांविधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य 'संविधानदूत' करतील; शिवाय, डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या केंद्राचे महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून संविधानदूत कार्य करतील. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयातील किमान एका शिक्षकाची 'संविधानदूत' म्हणून निवड करतील. जागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यामध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आदींचा समावेश असेल. संयुक्त संशोधनकार्यही हाती घेण्यात येईल. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राने हाती घेतलेला 'संविधानदूत' हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. त्या माध्यमातून भारतीय संविधानाविषयी विद्यापीठ परिक्षेत्रात जागृती करण्यात येणार असून सांविधानिक मूल्ये आणि मूलभूत मानवी मूल्यांबाबत विद्यार्थी व नागरिक यांना अवगत करण्याच्या दृष्टीने तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

### 'भारतीय संविधान'वर परिसंवाद

**डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे संविधानदिनाच्या निमित्ताने येत्या सोमवारी (२७ नोव्हेंबर) विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात 'भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर परिसंवाद आयोजित केला आहे. परिसंवादात डॉ. रविवंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि राजेंद्र कुंभार (सातारा) हे सहभागी होतील. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असतील.**

26 NOV 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील वाय-फायचे काम अंतिम टप्प्यात

## विद्यार्थ्यांना माफक दरात वाय-फाय सुविधा उपलब्ध : तंत्रज्ञानासोबत संकल्पनेला वेग

प्रतिनिधी
कोल्हापूर •

सोशल मीडियाच्या युगातील विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानासोबत मैत्री अधिक वेगाने व्हावी, यासाठी शिवाजी विद्यापीठ आणि रिलायन्स जिओ यांच्यामध्ये करार झाला आहे. या करारांतर्गत योजनांमुळे तंत्रज्ञानासोबत संशोधन या संकल्पनेला वेग येणार आहे. विद्यापीठ परिसरात गेल्या महिन्याभरापासून याचे काम अतिशय वेगाने सुरू असून याचे काम अंतिम टप्प्यात आहे.




कोल्हापूर : वायफायची लाईन टाकण्यासाठी खुदाई करताना कर्मचारी.

तंत्रज्ञानाच्या युगात देशभरातील सर्वच विद्यापीठ व महाविद्यालये वायफाय युक्त झाली आहेत. शिवाजी विद्यापीठाने जिओ रिलायन्सबरोबर सामंजस्य करार करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना माफक दरात जिओची वाय–फाय सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. या करारांतर्गत १० ते ५० एमबी इंटरनेट निः शुल्क देणार आहे. त्यानंतर जेवढे इंटरनेटचा वापर होईल तितकेच शुल्क संबंधीत विद्यार्थ्याला मोजावे लागणार आहे. प्रस्तावित वाय–फाय सेवेचा वेग जास्त असल्यामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीने संशोधन, नवी माहिती मिळवणे सहज शक्य होणार आहे. हि सेवा ऐच्छिक असणार आहे. वाय–फाय सुविधेसाठी लागणारी उपकरणे व देखभालीचा खर्च रिलायन्स जिओ करणार आहे. रिलायन्सने जिओधारकांना माफक दरात सर्वांना माफक दरात सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मग विद्यापीठ हा अट्टहास कोणासाठी करीत आहे, असा प्रश्न शिक्षण क्षेत्रांतून उपस्थित केला जात आहे.

**जैवविविधतेवर परिणाम होण्याची शक्यता**

शिवाजी विद्यापीठाला ऑक्सीजन हब म्हणून ओळखले जाते. बहूतांश नागरिक विद्यापीठात फिरायला येतात. तसेच अनेक प्रकारचे पक्षी, व वनस्पतीही येथे आहेत.मात्र विद्यापीठ परिसरात वायफायच्या पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु असल्यामुळे धुरळा उडत असून प्रदुषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, अशी प्रतिक्रिया नाव न सांगण्याच्या अटीवर दिली.

**वाय-फायचे डिसेंबरमध्ये उद्घाटन : डॉ. नांदवडेकर**

जिओने सुरू केलेले वायफायचे काम ३० नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होणार असून सध्या वायफाय रेंज आणि इतर सुविधांची तपासणी (टेस्टींग) सुरू आहे. या सुविधेचे उद्घाटन डिसेंबरमध्ये करण्यात येणार आहे. विद्यार्थी केंद्रीत दृष्टीकोन ठेवून विद्यापीठाने जिओबरोबर वायफायचा करार केला आहे.

26 NOV 2017 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Now, SUK to send workshop participation certs via e-mail

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has started handing out digital copies of participation certificates for those who attended workshops and other events hosted by the Varsity.

"Every year, SUK hosts around 100 national workshops or conferences. Each event can see attendance exceeding 100 if participants are given digital participation certificates," D T Shirke, pro-VC of SUK, said.

Shirke added that SUK officials have been working hard towards the digitization process. He said the efforts would make SUK a "trendsetter". The digital certificates are easy to procure and download via email and chances of them getting lost in the mail are close to zero," the vice chancellor said.

**Every year, the university hosts around 100 national workshops or conferences. Each event can see attendance exceeding 100 if participants are given digital participation certificates**



"We started offering digital copies of participation at Avhaan - the 10-day National Service Scheme (NSS) camp, in which over 1,200 students from across 18 universities participated. The event was held in June," he said.

University officials also hope the digitization only attracts interested participants to the events. "The season of seminars starts in December. Digitization will allow us to confirm the attendance of an individual for an event. Gone are the days when could receive a certificate after just signing the register," Shirke said.

Digitization is also helping the University save money.

"Earlier this year, we sent the convocation invites to over 50,000 students via emails and SMS. We saved Rs 12 lakh in postage and printing costs. It saved us heavy financial requirements as well as time," Shirke said.

Sattappa Mohite, a city-based education activist, welcomed the move. He said the SUK digitization process would increase awareness on the kind of digital innovation the world has been experiencing.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2017
पुढारी

# 'संविधान दूत' रुजवणार लोकशाहीची मूल्ये

## ▪ विद्यापीठाचा संविधानदिनानिमित्त उपक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधानदिनानिमित्त (दि. २६) 'संविधान दूत' ही अभिनव योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याच्या माध्यमातून संविधान दूत लोकशाहीतील संविधानिक मूल्यांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य करणार आहेत.

देशाचे भावी नागरिक सक्षम व प्रगल्भ होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षता या मानवी मूल्यांची रुजवात व्हावी, भारतीय संविधानाबद्दल जागृतीच्या दृष्टीने विद्यापीठ कार्यक्षेत्रात विशेष योजना राबविण्याचे डॉ. आंबेडकर केंद्राने ठरविले. त्यानुसार संविधान दूत योजना हाती घेण्यात आली आहे. भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांत जागृती निर्माण करणे ही प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

डॉ. आंबेडकर केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांची माहिती समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी महाविद्यालयीन प्रतिनिधी म्हणून संविधान दूत कार्य करतील. डॉ. आंबेडकर केंद्र व संलग्नित महाविद्यालये एकत्रितपणे व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग आदी जागृतीपर कार्यक्रम घेतील. संयुक्त संशोधन कार्यही हाती घेण्यात येणार असून, यात शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह समाजघटकांनाही सामावून घेतले जाणार आहे, अशी माहिती संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. एस. एस. महाजन यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राने हाती घेतलेला 'संविधान दूत' हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या माध्यमातून भारतीय संविधानाविषयी विद्यापीठ परिक्षेत्रात जागृती करण्यात येणार असून, संविधानिक मूल्ये व मूलभूत मानवी मूल्यांबाबत विद्यार्थी, नागरिकांना माहिती करून देण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 NOV 2017
पुढारी

# संविधान दिनानिमित्त उद्या परिसंवाद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे संविधान दिनानिमित्त सोमवारी (दि. २७) सकाळी १०:३० वाजता राजर्षी शाहू सभागृहात 'भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. परिसंवादात डॉ. रविचंद होवाळ (सोलापूर), प्रा. सुभाष दगडे (सांगली) आणि राजेंद्र कुंभार (सातारा) हे सहभागी होऊन विचार मांडणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
26 NOV 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी जम्बो संघ

## शिवाजी विद्यापीठ : १२० खेळाडू; दापोलीत उद्यापासून प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : दापोली येथे आज, सोमवार (दि. २७) ते १ डिसेंबरदरम्यान राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ स्पर्धा होणार आहेत. यामध्ये शिवाजी विद्यापीठाचा १२० खेळाडूंचा जम्बो संघ सहभागी होणार आहे.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा १२० खेळाडूंचा मुले व मुलींच्या गटातील मुलींचा संघ सहभागी होणार आहे. ॲथलेटिक्स बास्केटबॉल, कबड्डी, खो-खो, व्हॉलिबॉल या क्रीडाप्रकारात विद्यापीठाचे खेळाडू सहभागी होतील. या संघाला गुरुवारी सायंकाळी क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडासंकुलात प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभेच्छा देण्यात आल्या. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आपल्या क्रीडाकौशल्याचे अचूक प्रदर्शन करीत या संधीचा योग्य उपयोग करून सहभागी खेळाडूंनी विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर उंचावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी.

या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभागाचे प्रभारी संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, प्रशिक्षक डॉ. के. बी. बेल्लद, एस. जे. फराकटे, एस. व्ही. बनसोडे, एस. एस. माळी, संजय एम. पाटील, डी. बी. बिरनाळे, शीला मोहिते, डॉ. एस. डी. पाटील, आर. एम. पाटील, कर्मचारी, खेळाडू आदी उपस्थित होते.